**<u>नगर रचना योजना क्र.४ जळगांव</u>**

नगर रचना योजना क्र.०४, असोदा शिवार, जळगांव महानगरपालिका, मंजूर करण्याबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ६८(२) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र.टिपीएस-३५२४/९००/प्र.क्र.१३१/२०२४/नवि-९,**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक - ०७ एप्रिल, २०२५**

**शासन निर्णय** :- सोबतची अधिसूचना (मराठी /इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,*

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(धैर्यशील ह. पाटील)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
७) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (नवि-१) नगर विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे.
२) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
३) सह संचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक.
४) जिल्हाधिकारी, जळगांव.
५) आयुक्त, जळगांव महानगरपालिका, जळगांव.
६) सहायक संचालक, नगर रचना, जळगांव शाखा, जळगांव.

(त्यांना कळविण्यात येते की, सोबतच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या नकाशाच्या पाच प्रती शासनास विहीत मार्गाने सादर करण्यात याव्यात.)

७) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्राच्या भाग-१ नाशिक विभाग, नाशिक पुरवणी भाग १ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ५ प्रती

या विभागास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सह संचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक, सहायक संचालक, नगर रचना, जळगांव शाखा, जळगांव, आयुक्त, जळगांव महानगरपालिका, जळगांव यांना पाठवाव्यात.

८) निवडनस्ती (नवि-९).

*************

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मुंबई - ४०० ०३२.**

# अधिसूचना

**दिनांक — ०७ एप्रिल, २०२५**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

**क्र.टिपीएस-३५२४/९००/प्र.क्र.१३१/२०२४/नवि-९:** ज्या अर्थी जळगांव महानगरपालिकेने (यापुढे "उक्त महानगरपालिका" असे संबोधिले आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ६० चे उपकलम *(१)* चे तरतूदीन्वये प्राप्त अधिकारात प्रशासकीय ठराव क्र.०३, दि.२१.०९.२०२३ अन्वये जळगांव महानगरपालिका हद्दीतील क्षेत्राकरीता प्रारूप नगर रचना परियोजना क्र.०४ तयार करणेबाबत इरादा जाहीर केला आहे व त्याबाबत उक्त अधिनियमाचे कलम ६० चे उपकलम *(२)* चे तरतूदीन्वये इरादा महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.०६.१०.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत करून, ज्या क्षेत्रासाठी नगर रचना परियोजना तयार करण्याचा इरादा जाहीर केला आहे त्या क्षेत्रासाठी प्रारूप नगर रचना परियोजनेचा मसुदा तयार केला आहे (यापुढे "उक्त प्रारूप नगर रचना परियोजना क्र.०४" असे संबोधिले आहे) व उक्त प्रारूप नगर रचना परियोजना उक्त अधिनियमाचे कलम ६१ चे उपकलम *(१)* चे तरतूदीन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.०१-०७.०२.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने उक्त प्रारूप नगर रचना परियोजना क्र.०४ प्रसिद्ध केल्यानंतर, संबंधित बाधित व्यक्तिंकडून प्राप्त सूचना / हरकतींचा योग्य तो विचार करून उक्त अधिनियमाचे कलम ६८ चे उपकलम *(१)* चे तरतूदीन्वये उक्त प्रारूप नगर रचना परियोजना प्राप्त सूचना / हरकतींच्या प्रतींसह शासनास, दि.१५.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरीकरीता सादर केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने शासनास सादर केलेली उक्त प्रारूप नगर रचना परियोजना क्र.०४ सादर केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत मंजूर करणे अथवा नामंजूर करणेबाबत शासनस्तरावर निर्णय होणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.५७४, दि.१९.०१.२०२४ अन्वये, उक्त प्रारूप नगर रचना योजना क्र.४, जळगांवबाबत सल्लामसलतीत सूचवल्याप्रमाणे आवश्यक ते बदल उक्त प्रारुप नगर रचना परियोजनेमध्ये करण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त प्रारूप नगर रचना परियोजना क्र.०४ काही बदलांसह व अटींसह मंजूर करणे आवश्यक आहे असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ६८ चे उपकलम *(२)* मधील शासनास असलेल्या शक्तीचा वापर करुन राज्य शासन खालीलप्रमाणे आदेश पारीत करित आहे;

क) उक्त प्रारूप नगर रचना परियोजना क्र.०४, जळगांव काही बदलांसह व अटींसह मंजूर करीत आहेत.

ख) मंजूर करण्यात आलेली उक्त प्रारूप नगर रचना परियोजना क्र.०४, जळगांव ही अमलात येणाचा दिनांक हा, प्रस्तुत अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासूनचा असेल, असे निश्चित करीत आहे, ज्यानुसार उक्त अधिनियमाचे कलम ६८-अ चे तरतूदीनुसार संबंधित भूखंड / जागा निहित होणेचा अमल लागू होत आहे.

ग) जळगांव महानगरपालिका / समुचित प्राधिकरण यांनी उक्त अधिनियमाचे कलम ६८-अ चे तरतूदीमध्ये नमूद केल्यानुसार भूखंड / जागांचा ताबा घ्यावा, असे निर्देशित करीत आहे.

घ) मंजूर नगर रचना परियोजना क्र.०४, जळगांवच्या अधिप्रमाणित प्रती किंवा दुरूस्त करण्याकरिता प्रमाणित केलेले उतारे यांच्या प्रती आम जनतेला अर्ज करून माफक दरात विक्रीसाठी जळगाव महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्याचे आयुक्त, जळगांव महानगरपालिका, जळगांव यांना निर्देशित करीत आहे.

**टिप** - (१) प्रस्तुतची अधिसूचना, उपरोक्त मंजूर नगर रचना परियोजना क्र.०४ दर्शविणाऱ्या नकाशाच्या प्रतीसह, आयुक्त, जळगांव महानगरपालिका, जळगांव यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(२) सदर अधिसूचना नगर विकास विभागाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध राहील .

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,***

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(धैर्यशील ह. पाटील)

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Urban Development Department**
**4th Floor, Main Building, Mantralaya,**
**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**
**Mumbai – 400 032.**

**NOTIFICATION**
**Date – 7th April, 2025**

***The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966***

**No.TPS-3524/900/CR-131/2024/UD-9:-** Whereas, the Jalgaon Municipal Corporation (hereinafter referred to as 'the said Municipal Corporation) in exercise of the powers vested in it under the provisions of sub section *(1)* of section 60 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as 'the said Act') by its Resolution No.03, dated the 21.09.2023, declared its intention to make the draft Town Planning Scheme No.04, Jalgaon for the area comprised in that scheme and published the declaration so made in accordance with the provisions of sub-section *(2)* of Section 60 of the said Act in the *Official Gazette*, on date the 06.10.2023;

And whereas, the said Municipal Corporation, after consultation with the Director of Town Planning, Maharashtra State, Pune a draft Town Planning Scheme No.04, Jalgaon (hereinafter referred to as "the said Draft Town Planning Scheme No.04") for the area in respect of which the declaration was made as aforesaid and published the said Draft Town Planning Scheme in the *Official Gazette*, dated the 01-07.02.2024 and in the other prescribed manner as required under the provisions of sub-section *(1)* of Section 61 of the said Act;

And whereas, the said Municipal Corporation, after considering the suggestions/objections relating to the said Draft Town Planning Scheme from the persons affected thereby, as required by the provisions of sub section *(1)* of section 68 of the said Act has submitted the said Draft Town Planning Scheme No.04 together with the copies of the suggestions / objections received by it to the Government and has applied for sanction vide its letter dated the 15.03.2024;

And whereas, it is necessary for the Government to accord its sanction to or refuse to accord sanction to the said Draft Town Planning scheme No.04 within a period of three months from the date of submission of the said Draft Town Planning scheme No.04 to the Government by the said Municipal Corporation;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune vide letter No.574, dated the 19.01.2024, has offered consultation on the said Draft Town Planning Scheme No.04, Jalgaon;

And whereas, the State Government after making such inquiry, as thought fit and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, proposes to sanction the said Draft Town Planning Scheme No.04, subject to certain modifications and conditions;

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

Now, therefore, in exercise of the powers conferred by the provisions of sub-section (2) of Section 68 of the said Act, and of all other powers enabling it on the behalf, the Government of Maharashtra hereby –

(a) Sanctions the said Draft Town Planning Scheme No.04, Jalgaon with some changes and subject to the conditions.

(b) Fixes the date of publication of this Notification in the *Official Gazette* as the date of coming into force of the sanctioned Town Planning Scheme No.04, which shall have effect as provided in the provisions of section 68A of the said Act, of vesting of such plots ;

(c) Directs that, the lands thereunder shall be taken into possession by the Jalgaon Municipal Corporation / Appropriate Authority, as stipulated under the provisions of section 68 A of the said Act;

(d) Directs that, the copies of the sanctioned Town Planning Scheme No.04 or extracts there from certified to be corrected, shall be made available for sale to the public on application at a reasonable price at the office of the Jalgaon Municipal Corporation.

**Note - (A)** A copy of the plans of the aforesaid sanctioned Town Planning Scheme No.04 - Jalgaon, shall be available for public inspection in the office of the Commissioner, Jalgaon Municipal Corporation, Jalgaon, during office hours on all working days for a period of one month.

**(B)** This Notification shall also be available on the Govt. web site- www.maharashtra.gov.in

***By order and in the name of the Governor of Maharashtra.***

URBAN DEVELOPMENT DEPTT. ★ MANTRALAYA, MUMBAI-32 ★ सत्यमेव जयते

(Dhairyashil H. Patil)
**Section Officer to Government**